# महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)

(विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त व महाराष्ट्र व गोवा शासन प्राधीकृत)

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सेट भवन, गणेशखिंड पुणे,-४११००७.

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्र.: ०२० – २५६२२४४६<br>संकेतस्थळ : https://setexam.unipune.ac.in | | फॅक्स क्र. : ०२० – २५६९९२५०<br>ई-मेल : set_coordinator@unipune.ac.in |

सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा


संदर्भ – OW/2021/G/127 दिनांक २२/०७/२०२१

## परिपत्रक

**राज्यस्तरीय पात्रता परीक्षा – सेट परीक्षार्थींसाठी तीन दिवसीय मोफत कार्यशाळा**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या मान्यतेने राज्य शासनाच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सेट विभागातर्फे महाराष्ट्र व गोवा राज्यातील उमेदवारांसाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) आयोजित करण्यात येते. या परीक्षेचे आयोजन दिनांक २६ सप्टेंबर, २०२१ रोजी करण्यात आलेले आहे.

राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) परीक्षार्थींसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सेट विभागाच्या वतीने पेपर–एक सामान्यज्ञान व शिक्षण तसेच परीक्षा पध्दती इ. बाबत दिनांक ३ ऑगस्ट पासून ५ ऑगस्ट २०२१ पर्यंत सकाळी १०.३० ते ४.०० वाजेपर्यंत तीन दिवसीय मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये सेट परीक्षा पेपर–एक मधील सामान्यज्ञान या विषयातील अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, परीक्षेतील वेळेचे नियोजन इ. विषयावर विषयतज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. तसेच या कार्यशाळेत परीक्षेचे स्वरुप, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, निकाल, गुणवत्ता यादी, आरक्षण अर्जामधील बदल इ. बाबत विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांवर तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

सहायक प्राध्यापक पदाच्यासाठी आवश्यक असणाऱ्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षेबाबत परीक्षार्थींना येणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण व्हावे तसेच गुणवत्तेत वाढ होण्यासाठी महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी परीक्षार्थींनी खालील Zoom लिंकचा उपयोग करावा.

zoom webinar ID : 865 8955 1748

passcode : 551421

तसेच सदर कार्यशाळेचे फेसबुकवरील https:www.facebook.com/ecdlic या लिंकवर लाईव्ह प्रक्षेपण करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त परीक्षार्थींनी सदर कार्यशाळेचा लाभ घ्यावा.

कुलसचिव तथा सदस्यसचिव

सेट परीक्षा